इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि., मुंबई

आयकर भवन , महर्षी कर्वे मार्ग, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.

९९ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २२.०८.२०२५ चे इतिवृत्त

इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. मुंबई या बँकेची ९९व्या अधिमंडळाची वार्षिक सभा शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयकर भवन, महर्षी कर्वे मार्ग, चर्चगेट, मुंबई कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात (शामीयानामध्ये), मुंबई ४०० ०२० येथे आयोजित करण्यात आली होती. सदरच्या सभेला नियोजित वेळेत गणसंख्या नसल्यामुळे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुधीर गुजर यांनी उपविधी क्र. ३३(१) नुसार गणसंख्ये अभावी सभा अर्ध्या तासाकरीता तहकूब करण्यात येत आहे तसेच सदर सभा अर्ध्या तासानंतर ठीक ३.३० वाजता पुन्हा याच ठिकाणी सुरू करण्यात येईल व त्यावेळी सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही असे सभागृहास सांगितले.

गणसंख्ये अभावी अर्ध्यातासाकरीता तहकूब करण्यात आलेले सभेचे कामकाज ठीक ३.३० वाजता सुरू झाले. सभा सुरू होते वेळी ९५४ सभासद उपस्थित होते. बँकेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुधीर गुजर यांनी उपस्थित सर्व सभासदांचे हार्दिक स्वागत केले आणि आजच्या सभेचे सुत्रसंचालन मा. संचालक श्री. प्रमोद वाघे करतील असे सांगितले. त्यानंतर श्री प्रमोद वाघे यांनी मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांना बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांना व्यासपीठावर सन्मानपूर्वक घेऊन येण्याची विनंती केली तसेच अन्य सर्व मा. संचालक मंडळ सदस्यांना ही मंचावर स्थानापन्न होण्याची विनंती केली.

त्यानंतर त्यांनी संगितले की, कामाच्या व्यस्ततेमुळे बँकेच्या पदसिध्द अध्यक्षा, आपल्या आयकर विभागाच्या प्रधान मुख्य आयकर आयुक्त मा. श्रीमती मालती श्रीधरन या सभेस उपस्थित राहू शकत नसल्यामुळे मी बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे साहेब यांना आजच्या ९९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष पद भुषवावे अशी मी बँकेच्या संचालक मंडळाच्यावतीने विनंती करतो. त्यानूसार मा. श्री. शीतल तळपदे साहेब यांनी सभेच्या अध्यक्षपदाचा स्विकार केला.

त्यानंतर मा. श्री. प्रमोद वाघे यांनी सभेचे अध्यक्ष, बँकेचे उपकार्याध्यक्ष , बँकेचे उपस्थित संचालक मंडळ सदस्य आणि बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यापूर्वी दिप प्रज्वलन करण्याची विनंती केली. त्यानूसार समस्त संचालक मंडळाने दिप प्रज्वलन केले.

त्यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरूवात करण्यापूर्वी आपल्यातुन जे सभासद दिवगत झालेले आहेत त्यांना आपण सर्व मिळून दोन मिनिट श्रध्दांजली अपर्ण करूया अशी सुत्रसंचालक श्री. प्रमोद वाघे यांनी सभागृहाला विनंती केली. त्यानूसार सर्वानी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अपर्ण केली.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. MUMBAI SEAL

त्यानंतर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांच्या हस्ते सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांचा पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. त्याच प्रमाणे मा. संचालक श्री. रवी शंकर यांच्या हस्ते मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांचा सत्कार करण्यात आला.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांच्या हस्ते बँकेच्या नवीन इव्हीएम चीप बेस कॉन्टॅकलेस डेबिट कार्ड एटीएम कार्डचे उदघाटन करण्यात आले. त्यानंतर श्री. प्रमोद वाघे यांनी सांगितले की, बँकेने सध्याच्या मोबाईल ॲपमध्ये बदल करून नवीन सुधारित मोबाईल ॲप सादर केला आहेत. या ॲपद्वारे आपल्याला नवीन सुविधा प्राप्त होणार आहेत आणि त्याची माहिती सभासदांना प्राप्त व्हावी याकरिता बँकेच्या आय. टी. विभागाने एक माहितीपट तयार केला आहे. तरी सभागृहाच्यावतीने मी आय. टी. अधिकाऱ्यांना विनंती करतो की त्यांनी हा माहितीपट प्रदर्शित करावा. त्यानुसार सभागृहामध्ये नवीन माहितीपट प्रदर्शित करण्यात आला.

त्यानंतर श्री. प्रमोद वाघे यांनी सांगितले की, आपले जुने सभासद निवृत्त होत आहेत आणि आयकर विभागात भरती होणारे नवीन कर्मचारी बँकेचे सभासद होण्यास उत्सुक नसतात त्यामुळे आपली सभासद संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. अश्या परिस्थितीत आपल्या बँकेचे संचालक श्री. किरण कुबल साहेब सभासद वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करतात. ते प्रशासकीय अधिकारी असून आयकर भवनाच्या प्रशासन विभागात कार्यरत आहेत. जेंव्हा नवीन कर्मचाऱ्यांची भरती होते तेंव्हा ते नवीन कर्मचाऱ्यांना बँकेच्या विविध योजनांची आणि सुविधांची माहिती देतात आणि त्यांना बँकेचे सभासद होण्यास प्रेरित करतात. वेळेप्रसंगी एखाद्या उमेदवाराकडे सभासद वर्गणी भरण्यास, खाते उघडण्यास पैसे नसतील तर ते स्वतः त्यांचे पैसे भरून त्यांना बँकेचे सभासद करून घेतात. तरी मी सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे साहेब यांना त्यांचा सत्कार करण्याची विनंती करतो. त्यानंतर श्री. किरण कुबल यांचा श्री. शीतल तळपदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तदनंतर श्री. प्रमोद वाघे यांनी उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांना त्यांचे मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली.

मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सभागृहाला संबोधीत करताना सर्व प्रथम बँकच्या संचालक मंडळाच्यावतीने उपस्थित सर्व सभासदांचे हार्दिक स्वागत केले. ते म्हणाले की, आपल्या बँकेची स्थापना पतपेढी म्हणून १७ ऑगस्ट २०२६ साली झाली आणि आपल्याला भारतिय रिझर्व्ह बँकेकडून बँकिंग लायसन्स १९८६ साली मिळाले. बँकेच्या या प्रदीर्घ वाटचालीत अनेक मान्यवरांनी अमूल्य योगदान दिले त्या सर्वांची नावे ज्ञात नाहीत परंतु आम्हाला ज्ञात असलेल्या १) श्री. विजय मेनन २) श्री सुनील दळवी ३) श्री. व्ही. एस भाटकर ४) श्री. अनंत शिंदे ५) श्री. मधुसूदन वैशंपायन ६) वामन धामापूरकर ७) सौ. प्रतिभा शेंडे ७) सौ. स्नेहा राणे ८) श्री. अशोक डोके ९) सौ. वनिता रासम १०) सौ. भावना सोनावणे ११) श्री. प्रमोद सावंत यांची आठवण बँक १०० व्या वर्षात प्रदार्पण करीत असताना आवर्जून काढावी लागेल. बँकेच्या प्रगतीत या व्यक्तींचे मोलाचे योगदान

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

आहे. एकप्रकारें आपल्या बँकेच्या छोटाश्या वृक्षाचा वटवृक्ष करून त्याची धुरा त्यांनी आमच्या हाती दिली असे मी म्हणेन असे ते म्हणाले आणि या सर्व मान्यवरांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

ते म्हणाले की १७ जानेवारी २०२० रोजी आम्ही निवडून आलो. पहिली दोन वर्ष करोना कालावधीत गेली. या कालावधीत बँकेचे कामकाज सुरु ठेवणे आवश्यक होते. त्यावेळचे बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रुपेश बेसेकर साहेब यांनी जे कर्मचारी कल्याण, बदलापूर येथे रहात होते त्यांना स्वताःच्या गाडीतून आणून बँक चालू ठेवली. सभासदांची अडचण विचारात घेऊन घरपोच बँकिंग सेवा दिली या बद्दल मी त्यांचे मनपूर्वक आभार मानतो. ते पुढे म्हणाले की ७ व्या वेतन आयोगामध्ये शासनाने फेस्टीव्हल अ‍ॅडव्हान्स ही संकल्पना रद्द केली. त्यामुळे सभासदांची निकड लक्षात घेता बँकेतर्फे फेस्टीव्हल अ‍ॅडव्हान्स देण्यास सुरवात करण्यात आली. मला येथे नमूद करण्यास आनंद होत आहे की, आपली ही योजना अत्यंत लोकप्रिय झाली असून बरेच सभासद या योजनेचा लाभ घेत आहेत.

ते पुढे म्हणाले की, आपण सी. एज. टेक्नोलॉजी यांची कोअर बँकिंग संगणक प्रणली वापरत होतो, मात्र या संगणक प्रणाली संदर्भात एटीएम कार्ड आणि अन्य कार्य प्रणाली बाबत तक्रारी येत होत्या त्यामुळे ही संगणक प्रणाली बदलून आपण बी. एस. जी. आय. टी. सॉफ्ट या कंपनीची नवीन अद्यावत कोअर बँकिंग संगणक प्रणली कार्यान्वित केली असून या संगणक प्रणालीद्वारे आपण आपल्या सभासद आणि खातेदारांना सर्व दैनंदित तसेच मोबाईल बँकिंग सारख्या अद्यावत सुविधा चांगल्याप्रकारे देत आहोत. सभासद कल्याण निधी अंतर्गत निर्दिष्ट आजारावरील उपचाराकरीता ना परतावा मदत म्हणून बँकेतर्फेप्रथम रु. १ लाख इतकी मदत देण्यात येत होती ती नंतर रू. १,५०,०००/– करण्यात आली आणि आता ही मर्यादा रु. २,००,०००/– पर्यत वाढविण्यात आली असून आपल्या अनेक सभासदांना या योजनेचा फायदा झाला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, पूर्वी एखाद्याचा अपघात झाला आणि त्याला शस्त्रक्रिया करावी लागली तर पाच लाखांपेक्षा जास्त बिल असेल तरच आपण वैद्यकीय मदत देत होत मात्र आता ही अट काढून टाकली आहे.

ते पुढे म्हणाले की, सभासदांना निवृत्ती नंतर बँकेतर्फे रू. २०,०००/– पर्यत निवृत्ती लाभ देण्यात येतो तरी या मध्ये पुढील प्रमाणे वाढ करण्याची संचालक मंडळाची शिफारस आहे.

सभासदत्व कालावधी	निवृत्ती लाभाची सध्याची रक्कम रु.	निवृत्ती लाभाची प्रास्तावित रक्कम
१० वर्ष ते १५ वर्ष	८०००	१००००
१५ वर्षपेक्षा जास्त ते २० वर्ष	१०५००	१२५००
२० वर्षपेक्षा जास्त ते २५ वर्ष	१२०००	१५०००
२५ वर्षपेक्षा जास्त ते ३० वर्ष	१५०००	२००००
३० वर्षपेक्षा जास्त	२००००	३००००

त्यांनी सांगितले की, आमच्या या कार्यकाळातील आपले सर्वात मोठे यश म्हणजे आपल्या बँकेने सुरू केलेली मोबाईल बँकिंगची सुविधा. मोबाईल बँकिंगमध्येही आपण सुधारणा केली असून सुधारित ॲपद्वारे आपल्याला कोण कोणत्या सुविधा मिळणार आहेत याचा माहितीपट आपण पहिला आहे. आता आपण युपीआय बँकिंगकडे जात आहोत. युपीआय सुविधा आपल्या एटीएम कार्डाशी निगडीत असते. आपण जरी कोअर बँकिंग सॉफ्टवेअरमध्ये बदल केला असला तरी सुध्दा सभासदांना एटीएम कार्ड बदलाचा त्रास होऊ नये या करीता आपण एटीएम स्विच पूर्वीच्या सिएज टेक्नोलॉजी कंपनीचाच वापरत आहोत. आता एटीएम, मोबाईल बँकिंग, युपीआय या सर्व एकाच कंपनीच्या छत्राखाली असाव्यात या करिता युपीआय सुविधेसाठी आपण बिएसजी आयटी सॉफ्ट यांची कोअर बँकिंग प्रणाली वापरणार आहोत. युपीआय सेवा कार्यान्वीत करण्यासाठी आपल्याला सिएज टेक्नोलॉजीची स्विच सेवा खंडीत करून बिएसजी आयटी सॉफ्ट कंपनीची एटीएम स्विच सेवा घ्यावी लागणार आहे आणि त्याकरीता आपल्याला सभासदांना नविन चीपबेस एटीएम कार्ड द्यावी लागणार आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

त्यांनी पुढे सागितले की, भारतिय रिझर्व्ह बँक जसे जसे रेपो रेट कमी करते तसे तसे बँकेने कर्जाचे रेट कमी केले आहेत. वित्तीय बाजारात पगारदारांच्या बँका तसेच अन्य बँकापेक्षा आपले कर्जाचे व्याजदर कमी आहेत. अलीकडेच १ ऑगस्ट २०२५ पासून आपण कर्जाचे व्याजदर कमी केले असुन सुधारित व्याजदरांची माहिती अहवालाच्या शेवटच्या पानावर दिली आहे. ते पुढे म्हणाले की, प्रत्येक संस्थेत कर्मचारी त्या संस्थेची ॲसेट असते त्यांच्या निवृत्ती नंतर संस्थेचे कामकाज सुरळीत चालावे या करीता त्यांची जागा भरून काढण्यासाठी नवीन कर्मचार्यांची भरती करावी लागते तरी आम्ही IBPS या नामांकित संस्थेद्वारे लिपिक आणि कार्यकारी अधिकारी यांची भरती केली असून कर्मचारी संघटनेबरोबर वेळोवेळी चर्चा करून कर्मचार्यांना वेळोवेळी पदोन्नतीही देत आहोत.

ते पुढे म्हणाले की, प्रत्येक बँकेचे वैधानिक लेखा परीक्षण होते. आपल्या बँकेला वैधानिक लेखा परीक्षणात गेली ५ वर्ष “अ” वर्ग प्राप्त झाला आहे. भारतिय रिझर्व्ह बँकेनेही आपल्या बँकेची आर्थिक तपासणी करून आपल्याला “ब” श्रेणी दिली आहे. यावरून आपल्या बँकेची सुयोग्य कामकाज आणि आर्थिक सक्षमता सिद्ध होते. त्यांनी पुढे सांगितले की, पूर्वी आपण इंटरनल ऑडीट करीत होतो त्यामुळे दर तिमाही आपल्या बँकेचे ऑडीट होत होते परंतु मागील वर्षी बँकेचे कंकरंट ऑडीट करण्याचा बँकेने निर्णय घेतला कंकरंट ऑडीटमध्ये दरदिवशी बँकेच्या दैनंदिन कामकाजाची तपासणी होते. आपल्या बँकेचे कंकरंट ऑडीट मे. वैद्य आणि वैशंपायन ही सनदी लेखापाल कंपनीने केले असून त्यांचे कामकाज समाधानकारक असल्यामुळे यावर्षी त्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. याच बरोबर आपल्या बँकेची सायबर सेक्युरीटी व्यवस्था आणि संगणक प्रणालीची कार्यक्षमता यांच्या तपासणी संदर्भात बँकेचे आय. एस. आणि व्ही. ए.पी. टी. ऑडीट होते अशी माहिती त्यांनी सभेला दिली.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

त्यांनी पुढे सांगितले की, बँकेचा डाटा ही सर्वात महत्वाची बाब आहे. हा डाटा आपल्याकडे उपलब्ध असणे गरजेचे असते की जेणेकरून एखादी अपरिहार्य घटना घडली किंवा आपल्याला सोफ्टवेअर कंपनी बदलावी लागली तर आपल्याला अडचण येणार नाही. या करीता आपण नवीन डाटा सर्वर घेत असून त्यावर आपल्या बँकेचा दैनंदिन डाटा स्टोर करून ठेवण्यात येणार आहे. ते पुढे म्हणाले की, आपली बँक कायम नफ्यात असून आपले सी. आर. ए. आर. चे प्रमाण १८.६६% इतके आहे, हे प्रमाण किमान ९% असावे असा भारतिय रिझर्व्ह बँकेचा नियाम आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, याही वर्षी संचालक मंडळाने सभासदांना १५% लाभांश आणि १५% सभासद वर्गणीवर व्याज देण्याची शिफारस केली आहे. आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सदरचा ठराव मंजूर झाल्यावर लगेचच ही रक्कम सभासदांच्या खात्यात जमा केली जाईल. ते पुढे म्हणाले की, सन २०२३ मध्ये भारतिय रिझर्व्ह बँकेने आपल्या बँकेची तपासणी केली त्यावेळी त्यांनी कौटिल्य भवन आणि पिरामल चेम्बर्स विस्तारित कक्षाचा परवाना आपल्याकडे आहे का ? अशी विचारणा केली असता सर्व ठिकाणी शोधूनही परवान्याची प्रत आपल्याला मिळाली नाही. तरी या प्रसंगी बँकेचे संचालक श्री. रवी शंकर साहेब यांनी त्यांच्या भारतिय रिझर्व्ह बँकेतील ओळखीचा उपयोग करून पाठपुरावा केला आणि त्यामुळे आपल्याला विस्तारित कक्षांचे नवीन लायसन्स मिळाले तरी मी याकरिता श्री. रवी शंकर साहेब यांचे विशेष आभार मानतो. तसेच बँकेचे संचालक श्री. राजेश मुज साहेब यांचे बँकेच्या कामकाजावर बारीक लक्ष असते ते बँकेचे ऑडीट रिपोर्ट आणि भारतिय रिझर्व्ह बँकेचे तपासणी रिपोर्ट बरकाईने पाहतात त्याचा पूर्तता अहवाल योग्यप्रकारे तयार करण्यास मदत करतात, तसेच श्री. एकनाथ अभंग साहेब यांनी बँकेमध्ये काम केले तरी त्यांचेही बँकिंग विषयक आणि कर्मचारी विषयक कामकाजात आम्हाला सहकार्य लाभते तरी त्यांचेही मी विशेष आभार मानतो. तसेच अन्य सर्व संचालक मंडळ सदस्य आपापल्यापरीने बँकेच्या कामकाजात सहकार्य करतात त्यांचेही मी आभार मानतो असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, आपली बँक या वर्षी १०० व्या वर्षात पदार्पण करणार आहे. तरी आपला शतकोत्सव दिमाखात साजरा होईल आणि हा कार्यक्रम एखादे मोठे सभागृह घेऊन करण्यात येईल. या करिता आपण रु. ८० लाख इतका राखीव निधी ठेवला आहे. तरी त्यावेळी जे संचालक मंडळ असेल ते निश्चितच चांगला कार्यक्रम करतील. ते म्हणाले की, बँकेच्या प्रगतीमध्ये सभासद आणि ठेवीदार यांचे महत्वपूर्ण योगदान आहे आणि त्यांनी आतापर्यंत जसे आम्हाला सहकार्य केले ते यापुढेही आम्हाला मिळत राहील अशी मी खात्री बाळगतो असे सांगून त्यांनी त्यांच्या भाषणाचा समारोप केला.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सभेला संबोधित केले. सर्वप्रथम त्यांनी सर्वांचे पुन्हा एकदा स्वागत केले आणि सांगितले की, आपण सर्वांनी बँकेच्या आर्थिक वर्ष २०२४ – २५ च्या ९९ व्या वार्षिक अहवालाचे अवलोकन केले असेल आणि बँकेच्या प्रगती बद्दल आनंद व्यक्त केला असेल. त्यांनी सांगितले की, मला गर्व वाटतो की, आपल्या बँकेला सक्षम आणि स्थिर ठेवण्याची भुमिका बँकेच्या संचालक मंडळाने

SEAL INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. MUMBAI

SEAL INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. MUMBAI

ठेवली आहे. आम्ही आमच्या सभासदांचे हीत साधण्यासाठी परिश्रम घेत आहोत आणि बँकेच्या प्रगतीसाठी काळजीपुर्वक आणि काटेकोरपणे कामकाज करीत आहोत. त्यानंतर त्यांनी सभासदांना देत असलेल्या तत्पर सेवेबद्दल बँकेच्या अधिकारी आणि कर्मचार्यांचे आभार मानले. ते म्हणाले की, बँकिंग सोपे आणि जलद गतीने करण्याचे आमचे धोरण आहे. आपणास माहीतच आहे की, हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. जगात १३ लाख सहकारी संस्था आहेत आणि त्यात ८.४३ लाख सहकारी संस्था भारतात असून आपली बँक त्यापैकी एक आहे. तरी बँकेच्या प्रगतीबद्दल मी सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन करतो आणि आपल्या सभासदांच्या सहकार्याने आपली बँक उतरोत्तर प्रगती करणार आहे याची खात्री देतो त्यांनी त्यांचे मनोगत संपविले.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभेच्या नोटीसीचे वाचन करण्याची सूचना केली. त्यानूसार त्यांनी सभेच्या सूचनेचे वाचन केले व अहवालातील मुद्रणदोषाची खालीलप्रमाणे माहिती दिली.

१) पान क्र. १३ वर तसेच इंग्रजी मजकुर पान क्र. २६ वर सभासदांना वैदयकिय आर्थिक मदत या तक्त्यामधील क्र. ४ वर रेणूका लाडे ऐवजी अरूण बाळकृष्ण लाडे असे वाचावे.

२) पान क्र. ६४ वरील अ. क्र. ४८ वरील विद्यार्थीनी १० वी ऐवजी १२ वी कॉमर्सची विद्यार्थीनी आहे याची नोंद घ्यावी.

यावर सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी असेसांगितले की, क्रियाशील आणि अक्रियाशील सभासद संकल्पना शासनाने रद्द केली आहे. तरी या संदर्भात बँकेने केलेल्या उपविधी दुरूस्तीस जर का आयुक्तांनी मंजुरी दिलेली असेल तर विषय पत्रिकेतील ११ वा विषय '९९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभेस अनूपस्थित असलेल्या सभासदांची अनूपस्थिती क्षमापीत करणे ' हा विषय वगळण्यात यावा अशी सुचना त्यांनी केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, आपण पाठविलेल्या उपविधी दुरूस्तीस मा. सहकार आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. ते पुढे म्हणाले की, क्रियाशील आणि अक्रियाशील सभासद संकल्पना शासनाने रद्द केल्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अनूपस्थितीमुळे सभासदांना जरी कायदेशिर अडचण येणार नसली तरी सर्वसाधारणपणे सभासदांची अनूपस्थिती क्षमापीत व्हावी याकरीता सदरचा विषय विषयपत्रिकेत घेण्यात आलेला आहे.

त्यानंतर श्री. प्रमोद दहाट यांनी अहवालामध्ये पान क्र. ६ वर वर्ष २०२०–२१ चा लाभांश १५% + ३% ऐवजी १८% असा लिहीण्यात यावा अशी सुचना त्यांनी केली असता. त्यांच्या सुचनेची नोंद घेण्यात येत आहे असे उपकार्याध्यक्षांनी सांगितले.

त्यानंतर विषय पत्रिकेनूसार सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यात आली.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

विषय क्र.१:– दि. २९.०८.२०२४ रोजी झालेल्या ९८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सभागृहास असे सूचित केले की, ९८ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त बँकेच्या नोटीस बोर्डवर तसेच वेबसाईटवर प्रदर्शीत करण्यात आले आहे तसेच एसएमएस लिंकदवारे सर्वांना वितरीत करण्यात आले आहे. त्यामुळे इतिवृत्ताचे वाचन करण्याची आवश्यकता आहे का ? अशी त्यांनी सभागृहाला विचारणा केली असता उपस्थित सभासदांनी इतिवृत्त वाचन्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले. त्यावर श्री. शीतल तळपदे यांनी इतिवृत्ताबद्दल कोणाला काही बोलावयाचे आहे का? अशी विचारणा केली.

यावर मा. सभासद श्री. प्रमोद दहाट यांनी सांगितले की, इतिवृत्तामध्ये पान क्र. १६ दोनदा आले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, सभेत चर्चा झालेल्या सर्वच गोष्टी इतिवृत्तात नमूद करणे योग्य नाही. सभेमध्ये ज्या गोष्टी घडल्या त्यापैकी काही गोष्टी संक्षिप्त कराव्या लागतात त्या अनूषंगाने त्यांनी पान क्र.४ वरील सभेची सुचना वाचन्याच्या वेळी झालेली चर्चा इतिवृत्तातून काढून टाकावी. पान क्र. ५ मध्ये ९७ व्या वार्षि क सर्वसाधारण सभेमध्ये सभेस अनूपस्थित असलेल्या सभासदांची अनूपस्थिती क्षमापीत करण्याबाबत घ्यावयाच्या विषयासंदर्भात ते सर्वानूमते मान्य करण्यात आले हे वगळून अध्यक्षांच्या परवानगीने सदर दुरूस्ती करण्यात आली असे नमूद करावे. तसेच या पानावर सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी या इतिवृत्तास माझा विरोध आहे असे सांगितले हे वाक्य इतिवृत्त सर्वानूमते मंजुर झालेले असल्याने काढून टाकावे अशी सुचना केली. पान क्र. ७ वरील पॅरा क्र. २ आणि ३ हा विषया संदर्भित नसल्यामुळे काढून टाकावा. पान क्र. १३ मध्ये प्रश्नार्थक असलेले वाक्य काढून टाकावे. पान क्र. १६ मध्ये सिरीयल क्र. ४ उपविधी दुरूस्तीमध्ये नसल्यामुळे काढून टाकावे. पान क्र. १७ मध्ये विषय क्र. १० मध्ये हा विषय ९७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये घेतला नव्हता या संदर्भातील वाक्य काढून टाकावे. पान क्र. १८ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपविधीमध्ये दूरूस्ती संदर्भात अहवालात जी दुरूस्ती सुचवली आहे ती अहवालाच्या दुरूतीच्या ठिकाणी नोंदविण्यात यावी. त्यानंतर त्यांनी सांगितले की, पान क्र. २१ वरील पॅरा क्र. ३ काढून टाका. पान क्र. २२ वरील पॅरा क्र. ०४ संबधीत पुढील सर्व संभाषन काढून टाकावे , पान क्र. २७ मध्ये त्यांनी जो ठराव मांडला तो पूर्णपणे मांडण्यात यावा आणि त्यास सुचक अनूमोदक नमूद करण्यात यावे अशी सुचना केली. त्यावर त्यांच्या सुचनेची नोंद घेण्यात येत असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी ९८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्त मंजूरीचा ठराव मांडला व त्यास सभागृहाने सुचविलेल्या दुरूस्तीसह मंजूरी देण्यात आली.

त्यानूसार सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

ठराव क्र.१:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को-ऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या ९८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ही सभा मंजुर करित आहे.

सुचक :– श्री. शेख मोहमंद जुबेर अहमद मिया

अनूमोदक :– श्री. विजय झगडे

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. २ – दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल आणि संविधानिकानी लेखापरीक्षकांनी तपासलेले ताळेबंद व नफा – तोटा पत्रक स्वीकृत करणे.

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. संजय कांबळे यांनी सदर विषया संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली. यावर सभासद श्री. विजयन एम. नायर यांनी बँकेने आयटी रिफंड संदर्भात कशी खातावनी केली याची विचारणा केली असता बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना इन्कम टॅक्स रिफंडची रक्कम बँकेच्या ॲडव्हान्स टॅक्स खाती समापित केली असून रिफंडवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम बँकेच्या नफा तोटा खाती वर्ग करण्यात आली आहे असे सांगितले.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

INCOME-TAX ... SEAL MUMBAI

यानंतर सर्वानूमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र. २ :–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को-ऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल, संविधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा–तोटा पत्रक ही सभा स्विकृत करीत आहे.

सुचक :– श्री. विजयन एम. नायर

अनुमोदक :– श्री. प्रमोद दहाट

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ३ – सन २०२४-२५ या सहकार वर्षामध्ये बँकेला झालेल्या नफा विभागणीसंबंधी संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीचा विचार करून मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

सदर विषय चर्चेला घेताना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. किरण कुबल यांनी सदर विषयासंबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली. या संदर्भात सभासद श्री. प्रमोद दहाट यांनी सांगितले की, शतक महोत्सव निधीपोटी रू. २६ लाख तरतूद प्रस्तावीत आहे. तरी सर्वसाधारण निधीची तरतूद कमी करून शतक महोत्सव निधीमध्ये अजुन रू. २० लाखांची वाढ करावी अशी सुचना त्यांनी केली. तसेच शतक महोत्सव वर्षानिमीत्त सभासदांना एक चांगला मोमेंटो देण्यात यावा अशी सुचना केली.

यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की, आपण मागिल तीन वर्षापासून दरवर्षी नफ्यातून शतक महोत्सव निधीपोटी तरतूद करीत आहोत. आता हा निधी रू. ८० लाख इतका झालेला आहे आणि ही रक्कम आपल्या सभासद संख्येचा विचार करता पुरेशी आहे व जर आपल्याला आवश्यकता भासली तर आपण यावर्षीच्या नफ्यातून त्याची पुर्तता करू शकतो तरी कोणत्याही परिस्थितीत शतक महोत्सव निधी कमी पडणार नाही असे त्यांनी सांगितले.

यानंतर सर्वानूमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र. ३:—

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को—ऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे मागिल वर्षाचा शिल्लक नफा **रू.३,४९२.८७** व अहवाल साली झालेला नफा रू. २,२८,२५,७५१.५६ मिळुन **रू. २,२८,२९,२४४.४३** एवढया एकूण नफ्याच्या विभागणीस खालीलप्रमाणे ही सभा मंजुरी देत आहे. :—

अ.क्र.	तपशिल	रूपये
१.	राखीव निधी नफ्याच्या २५%	५७,०७,३२५.००
२.	लाभांश (१५%)	४७,५८,८६१.००
३.	सर्वसाधारण निधी	८५,३०,०००.००
४.	सभासद कल्याण निधी	१०,००,०००.००
५.	शिक्षण निधी १%	२,२८,३००.००
६.	शतक महोत्सव निधी	२६,००,०००.००
७.	पुढील वर्षासाठी शिल्लक नफा	४,७५८.४३
	एकूण	**२,२८,२९,२४४.४३**

सुचक :— प्रकाश संभाजी डोळस

अनुमोदक :— श्री. रूपेश सदानंद आंबेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ४ – सन २०२४-२५ सालचा संविधानिक लेखा परीक्षकांचा अहवाल वाचून स्वीकृत करणे.

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. रवी शंकर यांनी सदर विषया संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली असता कोणतीही सुचना आली नाही.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

विषय क्र. ६ – भारतीय रिझर्व बँकेने दि. २७.०४.२०२१ च्या परिपत्रकाने दिलेल्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करण्याबाबत मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देणे.

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी या विषयाबाबतची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याना सभागृहास देण्यास सांगितले. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सांगितल की, भारतीय रिझर्व बँकेच्या दि. २७.०४.२०२१ रोजीच्या परिपत्रकानूसार वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक भारतीय रिझर्व बँकेच्या पूर्व परवानगीने करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. त्याच प्रमाणे एक वैधानिक लेखापरिक्षक तीन वर्ष बँकेचे वैधानिक लेखापरिक्षण करू शकतो. मे. साज अॅण्ड असोसिएटस् यानी आपल्या बँकेचे तीन वर्ष लेखापरिक्षण केल्यामुळे त्यांची मुदत संपली आहे.
या अनूषंगाने संचालक मंडळाने सन २०२५–२६ च्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी मे. कोठावडे अॅण्ड लड्ढा, चार्टर्ड अकाऊंटंट या अनुभवी सनदी लेखापाल संस्थेची भारतीय रिझर्व बँकेकडे शिफारस केली होती त्यास त्यांनी त्यांच्या दि. २४.०६.२०२५ रोजीच्या पत्रादवारे मान्यता दिली आहे. तरी मी सभासदांना विनंती करतो की, त्यांनी या नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी दयावी.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. एकनाथ अभंग यानी सदर विषयासंबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली असता कोणतीही सुचना आली नाही.

यानंतर सर्वानूमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र. ६:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि. या बँकेच्या १९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक २७.०४.२०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणेबाबत शासनाने निश्चित केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतील भारतीय रिझर्व बँकेने त्यांच्या दि. २४.०६.२०२५ रोजीच्या पत्रादवारे मान्यता दिलेल्या मे. कोठावडे अॅण्ड लड्ढा, चार्टर्ड आकाऊंटंट यांची आर्थिक वर्ष २०२५–२६ चे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्यास ही सभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचक :– श्री. संजय कृष्णा भोसले

अनुमोदक :– श्री. दिपक यादव दाणी

ठराव सर्वानुमते मंजुर

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

SEAL INCOME ... LTD

यानंतर सर्वानूमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र. ४ः–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट कों –ऑप. बँक लि. या बँकेच्या १९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, सन २०२४-२५ या वर्षाचा संविधानिक लेखा परिक्षण अहवाल हिशेब तपासनिसांचा अहवाल वाचून ही सभा स्विकृत करीत आहे.

सुचक :– श्री. अरूण ए. पुजारी

अनुमोदक :– श्री. विकास सहदेव मोरे

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ५ – सन २०२६-२७ सालासाठी समवर्ती लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. परमानंद ठाकुर यांनी सदर विषयासंबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली असता कोणतीही सुचना आली नाही.

यानंतर सर्वानूमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र. ५ः–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट कोऑप. बँक लि. या बँकेच्या १९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, सन २०२६–२०२७ सालासाठी समवर्ती लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार ही सभा माननीय संचालक मंडळास प्रदान करीत आहे.

सुचक :– श्री. बसवेश्वर पोळ

अनुमोदक :– श्री. महेश धाकु दळवी

ठराव सर्वानुमते मंजुर

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. MUMBAI SEAL

INCOME-TAX MUMBAI SE

विषय क्र. ७ – आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. राजेश मुंज यांनी सदर विषया संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली असता कोणतीही सुचना आली नाही.

यानंतर सर्वानूमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

<u>ठराव क्र.७:–</u>

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, आर्थिक वर्ष २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :– श्री. संतोष बाळा कळमकर

अनुमोदक :– श्री. सुभाष चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ८ – बँकेच्या सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकापेक्षा बाबनिहाय जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच सन २०२५-२६ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. अरूण घाडीगांवकर यांनी सदर विषया संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली असता कोणतीही सुचना आली नाही.

यानंतर सर्वानूमते खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र. ८:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट कोऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, बँकेच्या सन २०२४–२५ च्या मंजूर अंदाजपत्रकापेक्षा बाबनिहाय जास्त

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

झालेल्या खर्चास तसेच सन २०२५—२६ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :— श्री. किशोर का. पवार

अनुमोदक :— श्री. अंकुश पी. भरगुडे

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ९ – संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीला मान्यता देणे.

उपरोक्त विषयासंदर्भात सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी याना सदर विषया संदर्भात सभागृहास माहिती देण्यास सांगतली.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, उपविधी क्र. १८ हा नॉमिनल मेंबर्स संदर्भात आहे. बँकेच्या गृह कर्जासंदर्भात बहुतांश वेळा तारण मालमत्ता अर्जदार आणि त्याची पत्नी किंवा पती याच्या संयुक्त नावाने असते. जर कर्जदाराने कर्जाची परतफेड केली नाही किंवा त्याचा मृत्यु झाल्यास सह मालमत्ता धारकावर बँकेस तो किंवा ती सभासद नसल्याने कलम १०१ अंतर्गत कायदेशीर कारवाई करता येत नाही. त्यामुळे सह मालमत्ता धारकास नॉमिनल मेंबर करून जामिनदार म्हणून घेता यावे या करीता नॉमिनल मेंबरला जामिनदार राहण्याचे अधिकार मिळण्यासाठी तसेच नॉमिनल मेंबरशीप फी सध्या १० रूपये आहे ती रू. १००/— करण्यासाठी उपविधी क्र. १८ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे उपविधी क्र. ३७ (ii) मध्ये बँकेच्या संचालक मंडळात दोन तज्ञ संचालक असावेत अशी तरतूद आहे. मात्र भारतीय रिझर्व बँकेच्या परिपत्रकानूसार ही अट पगारदार सहकारी बँकाना लागू नसल्याने सदरची तरतूद उपविधीमधुन काढून टाकण्यासाठी उपविधी क्र. ३७ (ii) मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे अशी माहिती त्यांनी सभेस दिली. त्यांनी पुढे सांगतील की, वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्या नंतर सदर प्रस्ताव मा. सहकार आयुक्त यांच्या मजुरीसाठी पाठवीला जाईल आणि त्यांच्या मंजुरीनंतरच उपविधीमध्ये बदल करण्यात येतील.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. अरूण घाडीगांवकर यांनी सदर विषयासंबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी कोणाला या विषयाबाबत सुचना करावयाच्या आहेत का? अशी विचारणा केली असता कोणतीही सुचना आली नाही.

यानंतर सर्वानूमते खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

ठराव क्र.९:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्ट मेंट को ऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, संचालक मंडळाने सुचविलेल्या बँकेच्या उपविधी क्र. १८ आणि ३७ (ii) मधील दुरुस्तीस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :– श्री. रविंद्र राजाराम गुरव

अनूमोदक :– श्री. अंकुश पी. भरगुडे

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. १० – बँकेच्या नवीन कर्मचारी संरचनेस (स्टफिंग पेटर्न) मंजुरी देणे.

उपरोक्त विषया संदर्भात सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर विषया संदर्भात सभागृहास माहिती देण्यास सांगितले.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, मा. सहकार आयुक्त यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदरचा विषय वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. बँकेचे दैनंदिन काम सुरळीत व्हावे या अनुशंगाने ही कर्मचारी संरचना तयार करण्यात आली असून त्यामध्ये सध्याची जी कर्मचारी संरचना आहे त्यामध्ये आवश्यकतेनुसार मात्र २ शिपाई पदांची संख्या वाढविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सद्याच्या कामचारी संरचनेत दोन आय. टी. अधिकाऱ्यांची तरतूद करण्यात आलेली आहे त्या ऐवजी एक कनिष्ठ आय. टी. व्यवस्थापक आणि एक आय . टी अधिकारी अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अश्या प्रकारे एकूण ३२ कर्मचारी असणारी संरचना मंजुरीसाठी ठेवण्यात आली आहे. सध्याच्या कर्मचारी संरचनेनुसार असलेल्या लिपिक पदांपैकी ४ पदे रिक्त आहेत आणि १ शिपाई पद रीक्त आहेत. तरी शिपाई पदाच्या नवीन २ पदांचा विचार करता ४ लिपिक पदे आणि ३ शिपाई मिळून एकूण ७ पदे भरण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी सांगितले.

यावर सभासद श्री. रुपेश आंबेकर यांनी विचारणा केली की, आपण सध्या दोन लिपिक कर्मचार्याना कनिष्ठ अधिकारी पदावर पदोन्नती दिली. तरी त्यांना १० ते १२ वर्षाचा अनुभव असताना त्यांना अधिकारी पदावर बढती न देता कनिष्ठ अधिकारी पदावर का बढती दिली अशी त्यांनी विचारणा केली. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप अंबोकर साहेब यांनी सांगितले की, आपली बँक ही युनिट बँक आहे त्यामुळे कर्मचारी संख्या कमी आहे. सबब कर्मचार्याना पदोन्नती लवकर मिळत नाही. त्याचप्रमाणे लिपिक पदावरून अधिकारी पदावर पदोन्नती दिल्यानंतर अशा कर्मचार्याला पुढील पदोन्नती मिळत नाही. त्यामुळे कर्मचार्यांची युनियन दि को-ऑप. बँक एम्प्लॉइज युनियन

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

यांनीच हे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव आमच्या पुढे मांडला आणि त्यामुळे कनिष्ठ अधिकारी हे पद तयार करण्यात आले आहे की जेणेकरून लिपिक असलेल्या कर्मचार्यास प्रथम कनिष्ठ अधिकारी आणि त्यानंतर अधिकारी अशी पदोन्नती मिळेल आणि त्यामुळे त्यास एकाच पदोन्नतीवर थांबून राहावे लागणार नाही.

या नंतर श्री. रुपेश आंबेकर यांनी अशी विचारणा केली की, आपल्याकडे पहिल्यापासून असिस्टंट मॅनेजर हे पद असताना आपण उपमुख्यकार्यकारी अधिकारी हे पद कशाला घेतले. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप अंबोकर साहेब यांनी सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अनुपस्थित पोकळी निर्माण होऊ नये याकरिता तसेच त्यांच्या निवृतीच्या वयाची मर्यादा ७० वर्ष आहे तरी त्यानंतर आपल्याकडे एखादी अनुभवी व्यक्ती तयार व्हावी यासाठी सदर पद निर्माण करण्यात आले आहे असे त्यांनी सांगितले.

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. परमानंद ठाकुर यांनी सदर विषया संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला.

यानंतर सर्वानूमते खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र. १०:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट कोऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, संचालक मंडळाने सुचविलेल्या बँकेच्या खालील प्रमाणे नवीन कर्मचारी संरचनेस (स्टफिंग पेटर्न) ही सभा मंजुरी देत आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	आवश्यक कर्मचारी संख्या
१.	मुख्य कार्यकारी अधिकारी	१
२.	उप मुख्य कार्यकारी अधिकारी / अनुपालन अधिकारी	१
३.	सहाय्यक व्यवस्थापक	१
४.	कनिष्ठ व्यवस्थापक आयटी	१
५.	अधिकारी आयटी	१
६.	कार्यकारी अधिकारी	२
७.	अधिकारी / कनिष्ठ अधिकारी	४
८.	लिपीक	१६

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

९.	दफ्तरी शिपाई	१
१०.	शिपाई	४
	एकूण कर्मचारी	**३२**

सुचक :– श्रीमती प्राजक्ता नितेश चिंदरकर
अनूमोदक :– श्री. प्रकाश गंगाराम चोंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ११ :– ९९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनूपस्थिती क्षमापित करणे.

सदर विषयासंदर्भात सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. संग्राम मुंडे यांनी सदर विषया संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला.

यानंतर सर्वानूमते खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

<u>ठराव क्र.११</u>:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्ट मेंट को – ऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, ९९ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :– श्री. विरेंद्र अभिमन्यु पेडणेकर

अनूमोदक :– श्री. सोपान जाधव

ठराव सर्वानुमते मंजुर

या नंतर मा. सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी अशी सूचना केली की, ही सभा पुढे चालविण्यासाठी कृपया सभागृहाची मंजुरी घेऊन सभेचे कामकाज पुढे सुरु ठेवावे अशी सूचना त्यांनी केली. यावर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे साहेब यांनी सभागृहाला विचारणा केली की, आत्तापर्यंत ११ विषयाचे कामकाज झालेले आहे तरी सभेचे कामकाज पुढे सुरु ठेवण्यास सभागृहाची मंजुरी असावी. त्यानंतर उपस्थित सभासदांनी सभा पुढे सुरु ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी दिली आणि त्या नंतर या सभेचे कामकाज पुढे सुरु करण्यात आले.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL * MUMBAI *

विषय क्र. १२:– अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

- सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयावर चर्चा करण्याची परवानगी दिली आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुधीर गुजर यांना सभासदांकडून बँकेला प्राप्त झालेल्या पत्रांचे वाचन करण्यास सांगितले. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे पत्रांचे वाचन केले आणि सदर पत्राबाबत मुद्देनिहाय खुलासा करण्यात आला.

पत्र १ :- प्रमोद दहाट (सभासद क्र. ६२५०) :- श्री. प्रमोद दाहाट यांनी त्यांच्या पत्रा व्दारे संचालक मंडळाच्या आणि सर्व कर्मचारी वृंद यांच्या कामगीरी बद्दल मनपूर्वक अभिनंदन व सुवर्ण शुभेच्छा व्यक्त केल्या होत्या. त्यांनी सांगितले की, त्यांना संचालक मंडळाचा अभिनंदनाचा ठराव मांडावयाचा आहे. तरी सदर ठराव अभार प्रदर्शना आधी मला मांडण्याची परवानगी दयावी अशी विनंती त्यांनी केली.

पत्र २ :- श्री. विजय झगडे (सभासद क्र. ६६०८):- श्री. विजय झगडे यांनी बँकेच्या शतकपुर्तीबाबत संचालक मंडळ आणि सभासदांचे अभिनंदन केले. तसेच ५ वर्षात उल्लेखनीय कामगीरी बद्दल संचलक मंडळ आणि कर्मचारी वर्गाला धन्यवाद दिले. सदर पत्रादवारे त्यांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या होत्या.

- सभासदांची बँकेमार्फत अपघात विमा पॉलिसी काढण्यात यावी. या पॉलिसीचा १० लाखाचा हप्ता साधारण रू. ३९९/– इतका येतो. बँकेकडून पॉलिसी काढल्यास हप्ता नचुकता भरला जाईल.
  यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, सर्वच सभासद पॉलिसी घ्यायाला तयार होत नाही. आम्ही मागे सभासदांची हेल्थ इंशुरन्स पॉलिसी काढण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्यास यश आले नाही फक्त ८० ते ९० फॉर्म आले होते. त्यामुळे या योजनेचा विचार करता येत नाही. जर सभासदाने पॉलिसी काढली तर इसीएसदवारे हप्त्याची रक्कम बँकेतर्फे भरता येईल.

- बँकेचा नेट एनपीए तरतूद केल्यामुळे शुन्य झाला आहे. तरी तरतूद नकरता एनपीए शुन्य करण्यासाठी आपण काय योजना केली आहे.
  यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, आपल्या बँकेचा मागिल वर्षी एनपीए रू. २ कोटी २८ लाख इतका होता अहवाल सालात आपण वसूलीचे विशेष प्रयत्न करून रू. ५९ लाखाने एनपीए कमी करून आता तो १ कोटी ६९ लाख इतका झालेला आहे.
  या एनपीए मध्ये ९० लाख हा सबस्टॅडर्ड म्हणजेच चालु एनपीए आहे हा सभासदांच्या तात्पुरत्या अडचणीमुळे निर्माण होतो आणि कमी जास्त होत असतो. उर्वरित जो ७९ लाखाचा एनपीए आहे तो जुन्या थकीत कर्जाचा आहे. यामध्ये ठावठिकाना उपलब्ध नसलेले कर्जदार तसेच अन्य जुन्या थकबाकीदारांचा समावेश आहे त्यांच्याही वसूलीचे प्रयत्न सुरू आहे. वसूलीसाठी सभासदांशी प्रथम वैयक्तीक तसेच दुरध्वनीवरून संपर्क साधला जातो. त्यानंतर त्यांना तसेच जामिनदारांना लेखी नोटीस पाठविण्यात येते. त्यानंतर कर्जदार जर दाद देत नसेल आणि कामावर ही येत नसेल तर जामिनदाराच्या पगारातुन वसूलीचे प्रयत्न करण्यात येतात. अशा प्रकारे सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही जर वसूली होत नसेल तर १०१ चा दावा दाखल करण्यात येतो. आपले ग्रॉस एनपीएचे प्रमाण फक्त १.६९ % इतके आहे व बँकिंग व्यवसायात थोड्या फार प्रमाणात एनपीएचे प्रमाण असतेच असे त्यांनी सांगितले.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI
INCOME-TAX DEPT. SEAL MUMBAI

पत्र ३ :– श्री. प्रदीप पाटकर आणि इतर ३३ सभासदांचे सामुहीक पत्र :– या पत्रादवारे सदर सभासदांनी प्रत्येक सभासदाला त्यांच्या वेतनातुन बँकेकडून कपात करण्यात आलेल्या वसूलीची तपशिलवार माहिती देण्यात यावी अशी विनंती केली होती. यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, आपण एसएमएस दवारे सर्वांना वेतनातून कपात केलेल्या रकमेबाबत माहिती देतो. तसेच आता जो नविन मोबाईल ॲप बँकेने सादर केला आहे त्यावर ही माहिती आपल्याला मिळू शकेल. या व्यतीरिक्तही आपणास माहिती हवी असेल तर आपण बँकेत येऊन ही माहिती घेऊ शकता असे त्यांनी सांगितले.

पत्र ४ :- आयकर विभाग स्थानिय लोकाधिकार समिती :- यांनी त्यांच्या पत्रादवारे खालील सुचना मांडल्या होत्या.

- कर्जदारास एनओसी प्रदान करण्यापूर्वी संबंधित जामीदारांची स्पष्ट लेखी संमती घेण्यात यावी.
- कर्ज मंजुरीच्या वेळी, कर्जदाराकडून एक अंडरटेकिंग लेटर घेण्यात यावे, ज्यामध्ये हे नमूद असेल की, काही अपरिहार्य कारणांमुळे कर्जाची परतफेड जामीदारांने केल्यास, कर्जदार किंवा त्याचा नॉमिनी ही रक्कम जामीनदारास परतफेड करेल. हे पत्र कर्जदाराच्या नॉमिनीच्या सह्या व संमतीसह संग्रहित ठेवावे.
- यासंदर्भात संचालक मंडळाने योग्य असा ठराव संमत करावा, जेणेकरून भविष्यात कोणत्याही जामीनदारास अन्यायकारक परिस्थितीत सापडावे लाग्णार नाही, व त्यांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण होईल.

यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, जामिनदारांकडून जी वसूली झालेली आहे. ती रक्कम कर्जदाराकडून किंवा त्याच्या खात्यातून वसूल करून जामिनदारांना देण्याचा बँकेला कोणताही कायदेशिर अधिकार नाही. तरी आपली जी कर्जदाराकडून कर्ज घेताना अंडरटेकिंग घेण्याची सुचना आहे ती चांगली असून याबाबत आम्ही नक्की विचार करू. मात्र असे अंडरटेकिंग जरी आपण घेतले तरी सुध्दा बँक याबाबत थेट कारवाई करू शकणार नाही परंतु या अंडरटेकिंगचा जामिनदारांना मात्र कर्जदार किंवा त्याचे वारस यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्यास फायदा होईल. यावर युनियच्या प्रतीनिधींनी असे सांगितले की, बँकेने वसूली करावी असे आमचे म्हणे नाही परंतु जामिनदाराकडे कर्ज दाराकडून रक्कम वसूल करण्यास काहीतरी आधार असावा या करीता हे अंडरटेकिंग घेण्यात यावे असे आमचे म्हणने आहे.

कर्जदाराच्या वारसांकडून अंडरटेकिंग घेण्याबाबत मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, असे करणे संयुक्तीक होणार नाही. कारण यासाठी स्वतः कर्जदार तयार होणार नाही आणि जर बँकेने त्याच्या वारसांकडून अंडरटेकिंग मागितल्यास तो बँकेकडून कर्ज न घेणे पसंत करेल असे त्यांनी सांगितले.

पत्र ५ :- श्री. मनिषकुमार नायर :- श्री. मनिषकुमार नायर यांनी बँकेने १०० व्या वर्षात पदार्पन केल्याबाबत आनंद व्यक्त करून संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच बँकेच्या नफावाढीबद्दल हे संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाच्या परिश्रमाचे फळ असल्याचे सांगितले.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

पत्र ६ :- श्री. संदीप श्रीधर ढोके (सभासद क्र. ५४२०) :- श्री. संदीप श्रीधर ढोके यांनी बँकेचे एसएमएस अॅलर्ट, मोबाईल बँकिंग सुविधा आणि त्यात केलेल्या सुधारणा याबद्दल संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले.

पत्र ७ :- श्री. प्रशांत सावंत (सभासद क्र. ८०६०) :- श्री. प्रशांत सावंत यांनी बँकेच्या प्रगती बद्दल आणि बँक देत असलेल्या अद्यावत सेवांबद्दल बँकेचे संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाची प्रशंसा केली.

पत्र ८ :- श्री. साजिद अयुब खातीब (सभासद क्र. ४७९२) :- श्री. साजिद अयुब खातीब यांनी बँकेने १०० व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल तसेच बँकेच्या नफा वृध्दीबद्दल आणि नेट एनपीएचे प्रमाण शुन्य झाल्याबद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच त्यांनी सर्व साधारण कर्ज आणि तात्काळ कर्जाचे व्याजदर कमी करावे अशी विनंती केली होती.

पत्र ९ :- श्री. सिताराम मिस्त्री (सभासद क्र. ७६८४) :- श्री. सिताराम मिस्त्री यांनी संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाकडून योग्यते मार्गदर्शन दिले जाते. सभासदांच्या तक्रारीवर तातडीने व योग्य कार्यवाही केली जाते याबद्दल तसेच बँकेकडून देण्यात येणाऱ्या अद्यावत सेवांबाबत संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

पत्र १० :- श्री. गौतम रंगारी (सभासद क्र. २०९५६७) :- श्री. गौतम रंगारी यांनी सांगितले कि, त्यांचा आजारपनाचा कालावधी हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात अंधारमय कालावधी होता. या कालावधीत त्यांना बँकेने केलेल्या वैदयकिय मदतीबद्दल त्यांनी संचालक मंडळाचे आभार मानले आणि जोपर्यंत ते आयकर विभागात आहेत तो पर्यंत ते बँकेचे सभासदत्व रद्द करणार नाहीत असे प्रतीपादान त्यांनी केले.

पत्र ११ :- श्री. क्रिष्णन पी मनी (सभासद क्र. ४४००) :- श्री. क्रिष्णन पी मनी यांनी बँकेने युपीआय सुविधा लवकरात लवकर सुरू करावी अशी विनंती केली तसेच बँकेच्या प्रगतीबद्दल संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले.

यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, युपीआय सुविधा सुरू करण्यासाठी आमचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात बँकेने एनपीसीआयकडे आवश्यक ती सर्व कागदपत्र सादर केली आहेत. तरी एनपीसीआयकडून मंजुरी मिळताच युपीआय सुविधा चालू करण्यात येईल.

पत्र १२ :- श्री सुरेश कोल्हे (सभासद क्र. ५५९८) यांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या होत्या.

- बँक फक्त नवीन घर घेण्याकरिता कर्ज देते परंतु सभासदाच्या जुन्या घरावर बँकेतर्फे कर्ज दिले जात नाही.

  यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, जुन्या इमारतीत सदनिका खरेदी करण्यास बँक कर्ज देते मात्र जुन्या जागेच्या तारणावर कर्ज देणे शक्य होत नाही कारण आपले सभासद पगारदार

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI
TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL

असल्यामुळे कर्जाचे योग्य कारण दाखविता येत नाही कारण आरबीआय नेहमी End Use of Fund तपासून पाहते.

- कर्जदार जेंव्हा नवीन कर्जाचा अर्ज करतो तेंव्हा त्यांच्या नव्या रहिवासाचा पत्ता नमूद करतो तरी त्यानुसार त्यांचा बँकेच्या दप्तरी असलेला पत्ता बदलून घ्यावा.

यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, जर सभासदाने त्याच्या नविन पत्त्याची केवायसी कागदपत्रे दिली तरच त्याचा पत्ता बदलता येतो फक्त कर्जाच्या अर्जावर नविन पत्ता लिहला म्हणून तो पत्ता बदलता येत नाही. तरी जर कर्जदाराने कर्ज अर्ज करताना त्याच्या नवीन पत्त्यासंदर्भात केवायसी कागदपत्र दिली तर त्याचा पत्ता बदलता येईल असे त्यांनी सांगितले. यावर श्री. सुरेश कोल्हे यांनी सांगितले की, ज्या वेळेस कर्जदार कर्जासाठी अर्ज करेल तेंव्हा कर्मचार्यांनी त्याचा पत्ता तपासून पाहावा आणि सदर कर्जदाराला त्याची नवीन पत्याची केवायसी कागदपत्र देण्याची विनंती करून त्यांचा पत्ता बदलून घ्यावा. यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी तशा सूचना कर्मचार्यांना देण्यात येतील असे सांगितले/

- त्यानंतरचा त्यांचा मुद्दा जमीनदारांच्या पगारातून वसुली झाली असल्यास कर्जदाराला बँकेने ना हरकत पत्र देऊ नये या बाबत होता. यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, या मुद्यावर चर्चा झालेली आहे आणि आपण येथून पुढे कर्जदाराकडून या बाबत अंडरटेकिंग घेणार आहोत.
- संचालकांनी सभासदांच्या अडचणी सोडविण्यासाठी बँकेत उपस्थित राहावे आणि ते बँकेत केंव्हा उपलब्ध असतील याबाबतची माहिती सूचना फलकावर प्रदर्शित करावी.
  यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, आयकर भवन येथे आम्ही दुपारी साधारण २.३० ते ३.३० या कालावधीत बँकेत असतो. तरी सभासद या वेळेत आमची भेट घेऊ शकतात.
- प्रत्येक संचालकाला फक्त २ वेळाच संचालक पदावर राहता येईल अशी व्यवस्था असावी.
  यावर मा. उपकार्याध्यक्ष यांनी सांगितले की, हा बदल बँकिंग रेगुलेशन कायद्यात करण्यात आला आहे. परंतु आपली निवडणूक ही महाराष्ट्र राज्य सहकारी कायद्या अंतर्गत सहकार आयुक्त यांच्या अखत्यारीत होते आणि या कायद्यात अजून बदल झालेला नाही. त्याचप्रमाणे आपल्या फेडरेशनने सुप्रीम कोर्टात या कायद्याला आव्हान दिले आहे. तरी शासनाकडून याबाबत निर्देश प्राप्त होत नाहीत तो पर्यंत प्रचलित पद्धतीनेच संचालकांच्या नेमणुका होणार आहेत असे त्यांनी सांगितले.

पत्र १३ : श्री. रुपेश आंबेकर (सभासद क्र. ७२७१) :-

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर पत्राचे श्री. रुपेश आंबेकर यांच्या मुद्यानुसार वाचन केले.

मुद्या क्र. १ – ए. टी. एम. मधून दिवसाला फक्त २० हजार निघतात आणि पहिले १० हजार निघतात नंतर ५ हजार दोन वेळा निघतात. इतर बँकेतून ३०हजार ते ५० हजार निघतात.

SEAL INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. MUMBAI

IE-TAX DEPT CO-OP. BANK LTD. SEAL

१. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की, आपल्या बँकेची एटीएम मधुन पैसे काढण्याची मर्यादा प्रती दिन रू. ३०,०००/– इतकी आहे मात्र एटीएम मशीन एका वेळेस रू १०,०००/– डिस्पेंस करते. याबाबत आम्ही पैसे काढुन बघीतले असता रू. १०,००० च्या पटीत पैसे आले. आपल्याला जो अनुभव आला त्यावेळी नक्की काय समस्या झाली होती ते आता कळणे शक्य नाही तरी आपणास पुन्हा जर ही समस्या उदभवली तर कृपया बँकेत कळवावे.

२. बँकेकडून एस.एम.एस. वेळेवर येत नाहीत आणि पगाराच्या दिवशी एस.एम.एस.आले नाहीत तर सभासदांची गैरसोय होते.

यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की, बँकेचे एसएमएस नियमीत जात आहेत. परंतु नेटवर्कची समस्या असेल तर एसएमएस स्किप होऊ शकतो. ज्या सभासदांनी डिपार्टमेंटने दिलेला बीएसएनएल मोबाईल नंबर बँकेला दिला आहे त्यांना नेटवर्क नसल्यामुळे एसएमएस मिळत नाहीत. तरी कृपया आपण दुसरा मोबाईल नंबर द्यावा अशी सूचना त्यांनी केली तसेच आम्ही या बाबत एसएमएस सर्विस प्रोव्हायडर बरोबर ही बोलू. तसेच आपल्याला असा अनुभव पुन्हा आला तर त्वरीत बँकेत कळवावे असे त्यांनी सांगितले.

३. आपण दि. ११.०६.२०२५ रोजी कौटील्य भवन येथे पैसे काढावयाला गेलो होतो. त्यावेळी आपली बँक १०.४५ ऐवजी ११.२० वाजता सुरू झाली. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की, ११ जुन रोजी बिकेसी विस्तारित कक्ष उशीराने सुरू झाला या बदल आम्ही कळवू इच्छितो की त्या दिवशी बँकेच्या अधिकारी सौ. शिबानी कोतवाल यांची पिरामल चेंबर्स येथुन बिकेसीला बदली झाली होती. त्यामुळे चार्ज टेक ऑव्हर आणि हॅन्ड आव्हर करण्यामुळे विलंब झाला, तरीही आम्ही संबंधीत कर्मचाऱ्यांना याबाबत सुचित करू.

४. सध्या आयकर विभागात बँकेचे सभासद श्री. नागेश कलमकर यांचे जामिनदार म्हणून वसूली झालेले प्रकरण चर्चेत आहे. तरी जामिनदार घेणे ऐवजी कर्जदाराचे मालमत्ता तारण घेऊन कर्ज दयावे की जेणे करून इतर सभासदांना जामिनदार म्हणून त्रास होणार नाही.
यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की, आपली बँक पगारदार व्यक्तींची बँक आहे आणि सभासदांकडे दयायला अतिरिक्त तारण नसते त्यामुळे आपण जामिनदार घेऊन कर्ज देतो. त्यामुळे तुम्ही जे म्हणताय की जामीनदार न घेता कर्ज द्या ते शक्य होणार नाही. जामीनदारांबाबत भारतिय रिझर्व्ह बँकेचे जे नियम आहेत त्याचे आपल्याला पालन करावे लागते. तरीही आम्ही भारतिय रिझर्व्ह बँकेचे जे अधिकारी तपासणीसाठी येतील त्यांच्याकडे तुम्ही जी सूचना केली आहे त्याबाबत विचारणा करू असे त्यांनी सांगितले.

र सभासद श्री. नागेश कलमकर यांनी सांगितले की, मी श्री. अविनाश साळवी यांना जामीनदार होतो. झ्या पगारातून श्री. अविनाश साळवी यांच्या कर्जापोटी वसुली झाली. जेंव्हा श्री. अविनाश साळवी नवृत्त झाले तेंव्हा मी बँकेत येऊन त्याची माहिती दिली होती त्यावेळी मी सांगितले होते की, बँकेने आपल्या कर्जाची वसुली करून घ्यावी आणि माझी कपात केलेली रक्कम मला द्यावी परंतु बँकेने स्वतची वसुली करून घेतली आणि माझी रक्कम मात्र मला वसूल करून दिली नाही.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सभागृहाला माहिती दिली की, श्री. अविनाश साळवी यांना श्री. नागेश कलमकर यांनी जामीनकी दिली होती. श्री. अविनाश साळवी बरीच वर्ष कामावर नव्हते त्यामुळे त्यांचे कर्ज थकबाकीत गेले. त्यांचा ठावठिकाणाही उपलब्ध नव्हता. खाते एन.पी.ए झाल्यामुळे आणि श्री. अविनाश साळवी यांच्याकडून वसुली होत नसल्यामुळे बँकेने जामीनदारांकडून वसुली सुरु केली आणि प्राप्त रक्कम श्री. अविनाश साळवी यांच्या कर्जखाती जमा करण्यात आली. त्यांच्या निवृत्तीनंतर कोणतीही रक्कम आपल्या बँकेकडे जमा झाली नाही. डिपार्टमेंटने त्यांची सर्व देय रक्कम त्यांच्या सरकारी बँकेतील खात्यात जमा केली. त्यांच्या मुलाने आम्हाला कर्जाच्या रकमेचे पी.डी.सी. चेक दिले होते ते आम्ही क्लिअरिंगला पाठविले असता पास झाले आणि कर्जाची वसुली झाली. तरी या प्रकरणी बँकेकडे कोणतीही रक्कम जमा झालेली नाही याची कृपया नोंद घ्यावी.

यावर श्री. नागेश कलमकर यांनी अशी विचारणा केली की, बँकेने श्री. अविनाश साळवी यांना ना हरकत पत्र का दिले ?

यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की, त्याच्या निवृत्तीसंदर्भात आम्हाला पेन्शन सेल मधून माहिती मिळाली. त्यावेळी निदर्शनास आले की, आपली जितकी कर्ज येणे बाकी आहे साधारण तितकीच रक्कम त्यांना मिळणार आहे. या संदर्भात त्यांची पत्नी आणि मुलगा यांनी पाठपुरावा केला व सांगितले की, कर्जाची येणे बाकी आहे त्यापेक्षा बँकेत भरण्यास कोणतीही रक्कम आमच्याकडे नाही. श्री. अविनाश साळवी हे स्वतः बँकेत येत नव्हते त्यांच्या पत्नी आणि मुलाची परिस्थितीही हालाखीची होती. त्यामुळे डिपार्टमेंटकडून मिळणाऱ्या रकमेशिवाय कर्ज वसूलीचा मार्ग नव्हता. त्यामुळे बँकेने त्यांच्या मुलाला आणि पत्नीला श्री. अविनाश साळवी यांच्या सहीचे पीडीसी चेक आणून देण्यास सांगितले आणि सदर पीडीसी चेक प्राप्त झाल्यानंतर बँकेच्या कर्जाची वसूली व्हावी याकरीता त्यांना एनओसी दिली आणि त्यामुळे या पीडीसी चेकदवारे बँकेच्या कर्जाची वसूली झाली नाहीतर बँकेच्या कर्जाची वसूली होऊ शकली नसती असे सांगितले.

यावर ही श्री. नागेश कलमकर समजुन घेण्यास तयार नव्हते. त्यावेळी मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, आपण हा विषय डिडिआर कडे घेऊन गेला होतात त्यांनीही आपले म्हणने अमान्य केले आहे.

यावर श्री. नागेश कलमकर यांनी सांगितले की, माझी विनंती अमान्य केली नसून बँकेने अशा प्रकारे कोणाचे पैसे परत केले असल्यास त्याची माहीती डिडिआरने मागितली असून ती मी त्याना दिलेली आहे आणि त्या संदर्भात डिडिआर बँकेच्या अधिकाऱ्यांना भेटायला बोलविणार आहेत.

यावर मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, डिडिआरकडे जर हे प्रकरण प्रलंबीत असेल तर त्याच्यावर आता कोणताही निर्णय होऊ शकत नाही. तरी डिडिआरकडून निर्णय प्राप्त झाल्यानंतर आपण यावर विचार करू असे त्यांनी सांगितले.

मा. सभासद श्री. प्रमोद दहाट यांनीही सांगितले की, या प्रकरणी डिडिआरचा निर्णय आल्या शिवाय चर्चा करण्यात काही अर्थ नाही. तरी डिडिआरचा निर्णय आल्या नंतर बँकेने याबाबत निर्णय घ्यावा असे त्यांनी सांगितले.

५. मला अशी माहीती मिळाली होती की, बँकेने आवश्यक त्या कार्यवाहीची पुर्तता न करता दोन शिपाई कर्मचाऱ्यांची भरती केली आहे. याबाबत मी मुख्य कार्यकारी अधिकारी याना विचारणा केली होती.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL

त्यानंतर त्यापैकी एका शिपायाला कामावरून काढुन टाकण्यात आले आणि दुसऱ्या शिपायाला अद्याप कामावर ठेवण्यात आले आहे. तरी एकतर दोघांनाही कामावर घ्यावे किंवा दोघांनाही काढुन टाकावे असे त्यांनी सांगितले.

यावर मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, आम्ही त्या शिपायाला कामावरून काढून टाकलेले नसून त्यांनी त्याच्या आजीच्या आजारपणामुळे स्वतःहून राजिनामा दिलेला आहे. त्यांच्या आजीला बघायला कोणीही नसल्यामुळे त्यांना गावी जावे लागणार होते त्यामुळे त्यांनी नोकरीचा राजिनामा दिला. याची कृपया नोंद घ्यावी आणि दुसरा जो मुलगा श्री. सुशांत जाधव आहे तो पूर्वी ३ वर्ष आपल्याकडे कॉन्ट्रॅक्टवर काम करीत होता. आपल्याकडे आयटी विभागात फक्त एकच व्यक्ती काम करीत होती. त्याच्या मुलाची तब्बेत बरी नसताना तो घरातुन बँकेचे कामकाज करीत होता. त्यावेळी कंत्राटावर असलेल्या या शिपायाने तो बीएससी आयटी असल्यामुळे आयटीच्या कामामध्ये मदत केली. त्यानंतरही वेळोवेळी आपल्याला त्यांनी मदत केली. त्याचे शिपाई म्हणून कामही उत्कृष्ट होते. बँकेच्या शिपाई पदाच्या प्रत्येक कामाची त्यांने चांगल्या प्रकारे माहीती करून घेतली होती. तरी अश्या कर्मचाऱ्याचा बँकेला उपयोग होईल या दृष्टीकोनातून त्याला संचालक मंडळाने बँकेच्या सेवेत घेण्याचा निर्णय घेतला. तरी संचालक मंडळाने या मुलाला बँकेच्या सेवेत घेऊन केवळ बँकेचे हीत पाहिले आहे याची कृपाया नोंद घ्यावी.

यावर श्री. रूपेश आंबोकर यांनी सांगितले की, बँकेकडे कंत्राटावर तीन कर्मचारी आहेत तरी बँकेने कोणताही कर्मचारी कंत्राटावर घेऊ नये यावर मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, आपल्याकडे कंत्राटावर फक्त दोन शिपाई आहेत. कंत्राटावर शिपाई घेतल्यामुळे पगाराच्या खर्चात बचत होते तसेच आपल्याला त्याचे पीएफ, ग्रॅच्युईटी, रजेचा पगार या गोष्टी पहाव्या लागत नाही. त्याची व्यवस्था कंत्राटदार करतो. याची कृपया नोंद घ्यावी.

पत्र १४ : श्री. राजेश मुढे :– या संदर्भात श्री. राजेश मुढे यांनी सांगितले की, आपल्याकडे डेली वेजेसवरील कर्मचारी आयकर विभागात बरेच वर्ष काम करत आहेत. परंतु त्यांना बँकेच्या सुविधा मिळत नाहीत तरी डेली वेजेस कर्मचाऱ्यांना जर बँकेच्या नियमानूसार सभासद करून घेता येत नसेल तर किमान त्यांना नॉमिनल मेंबर करून किमान रू. ५०,०००/– इतके कर्ज देण्यात यावे व त्यांच्या मुलाचा बँकेच्या गुणवंत विद्यार्थी सोहळ्यामध्ये सत्कार करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

यावर मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, हा प्रस्ताव गेली दोन वर्ष आमच्याकडे येत आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या नियमानूसार ते सभासद नसल्यामुळे आपण त्यांना कर्ज देऊ शकत नाही. मात्र त्यांना नॉमिनल मेंबर करून आपण त्यांच्या गुणवंत मुलांचा गुणवंत विद्यार्थी सोहळ्यामध्ये सत्कार करू शकतो. मात्र त्यांना नॉमिनल मेंबर करून घेण्याबाबत उपविधीमध्ये तशी तरतूद करण्यासाठी सुधारणा करावी लागेल.

यावर सविस्तर चर्चेअंती उपस्थित सभासदांनी त्यास मान्यता दिली आणि त्यानूसार सर्वानूमते खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL

ठराव क्र.१२:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि. या बँकेच्या १९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, इन्कम टॅक्स डिपार्टमेंटमध्ये डेली वेजसवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बँकेचे नॉमिनल मेंबर करण्यात येऊन त्यांच्या गुणवंत मुलांचा गुणवंत विद्यार्थी सोहळ्यामध्ये सत्कार करण्यात यावा तसेच बँकेतर्फे जे सामाजिक उपक्रम केले जातील त्याचा फायदा त्यांना देण्यात यावा. मात्र सदर डेली वेजेस कर्म चारी नोमिनल मेंबर झाल्यानंतर कोणतेही कर्ज घेण्यास किंवा कोणासही जामिन राहण्यास पात्र नसतील.

पुढे असे ठरविण्यात आले की, बँकेच्या उपविधीमध्ये सदर सुधारणा करण्याकरीता नॉमिनल मेंबरशी संबंधीत उपविधी क्र. १८ मध्ये सयुक्तीक सुधारणा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :– श्री. राजेश मुढे

अनूमोदक :– श्री. मुकुंद परब

ठराव सर्वानुमते मंजुर

अश्या प्रकारे सर्व पत्रांचे वाचन झाल्यानंतर सभासद निवृत्ति लाभाची रक्कम वाढविण्याबाबत खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र.१३:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि. या बँकेच्या १९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, सभासदांना देण्यात येणाऱ्या निवृत्ती लाभाच्या रकमेत दि. ०१.०९.२०२५ पासून खालील प्रमाणे वाढ करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सभासदत्वाचा कालावधी	पूर्वीचे अर्थ सहाय्य रू.	०१.०९.२०२५ पासून सुधारीत अर्थसहाय्य
१० वर्षावरील ते १५ वर्ष	८,०००/–	१०,०००/–
१५ वर्षावरील ते २० वर्ष	१०,५००/–	१२,५००/–
२० वर्षावरील ते २५ वर्ष	१२,०००/–	१५,०००/–
२५ वर्षावरील ते ३० वर्ष	१५,०००/–	२०,०००/–
३० वर्षा पुढे	२०,०००/–	३०,०००/–

सुचक :– श्री. मुकुंद परब

अनूमोदक :– श्री. श्री. अरूण ए. पुजारी

ठराव सर्वानुमते मंजुर

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * SEAL

त्यानंतर कोणाला काही सुचना करावयाच्या आहेत का ? अशी विचारणा सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे सहेब यांनी केली असता बँकेचे सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी सांगितले की, सध्या बँकेतर्फे आपल्या १ लाख फॅस्टीवल अॅडव्हांस दिला जातो तरी त्यात १० ते २० टक्के वाढ करण्यात यावी अशी विनती त्यांनी केली. यावर मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, फॅस्टीवल अॅडव्हास करीता आपण कोणतेही तारण घेत नाही व विना तारण कर्जा संदर्भात भारतीय रिझर्व बँकेच्या काही मर्यादा आहेत. तरी त्यापेक्षा जास्त कर्ज देता येत नाही. सबब याबाबत योग्यती तपासणी करून निर्णय घेण्यात येईल.

त्यानंतर सभासद श्री. सोपान जाधव यांनी अशी सुचना केली की, आपण १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करतो तरी त्याचबरोबर पदवीधर गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात यावा. तसेच बँकेमध्ये एटीएम मशीन बसविण्यात यावी.

यावर मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, पदवीधर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याबाबत आपली सुचना योग्य असून पुढील वर्षापासून आपण ती सुरू करू असे त्यांनी सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की, एटीएम मशीन बसविण्यासाठी खर्च खुप येतो आणि जर ती बँकेच्या आवारात बसवली तर बाहेरची लोकही एटीएमचा वापर करायला इमारतीत येतील आणि त्यामुळे सुरक्षेची समस्या निर्माण होईल या कारणास्तव आम्ही एटीएम मशीन बसविण्याचा निर्णय घेतलेला नाही.

त्यानंतर मा. उपकार्याध्यक्षांनी सांगितले की, मा. श्री. प्रमोद दहाट साहेब यांच्या सुचनेनूसार आपण विपश्यना रिसर्च इन्स्टि्युट, धम्मगिरी, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना पत्र लिहीले असून आता आपल्या बॅकेच्या कर्मचाऱ्यांनी जर विपश्यना कार्यक्रमात भाग घेतल्यास त्यांना बँकेतर्फे विशेष रजा देण्यात येणार आहे. असे सांगुन त्यांनी प्रमोद दहाट यांनी याबाबत सातत्याने पाठपुराव केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

INCOME-TAX DEPT CO-OP BANK LTD. MUMBAI SEAL

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL

त्यानंतर सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी संचालक मंडळाचा खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला.

ठराव क्र.१४:–

आज शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि. या बँकेच्या ९९ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, "आपल्या बँकेचे आदरणीय संचालक मंडळा व समर्पित कर्मचारीवृंद यांनी गेल्या पाच वर्षात सातत्यपूर्ण कार्य तत्परता , निष्ठा व दूरदर्शी दृष्टिकोन यांच्या बळावर संस्थेला उतुंग शिखरावर पोहोचविले आहे. त्यांच्या प्रयत्नांतून मिळविलेले हे यश केवळ आकडेवारीतील वाढ नव्हे, तर बँकेच्या सुवर्ण इतिहासातील झळाळते, अविस्मरणीय व प्रेरणादायी पान आहे. संचालक मंडळ व कर्मचारीवृंद यांनी दाखविलेली एकजुट, सेवाभाव व कर्तव्यनिष्ठा या सभेस अभिमानाने नोंदवावीशी वाटते. त्यांच्या अथक परिश्रम, प्रमाणिक सेवा व शिखरस्पर्शी यशाबद्दल या सभेतून मनःपूर्वकअभिनंदन सुवर्ण शुभेच्छा व कृतज्ञ वंदन."

सुचक :– श्री. प्रमोद दहाट

अनूमोदक :– श्री. महेश धाकु दळवी

ठराव सर्वानुमते मंजुर

त्यानंतर मा. संचालक श्री. किरण कुबल साहेब यांनी आभार प्रदर्शन केले आणि महाराष्ट्र गीत व राष्ट्रगीतानंतर सभेच्या अध्यक्षांनी सभा संपल्याचे घोषित केले.

मुंबई
दि. ०९.१०.२०२५

श्री. सुधिर राजाराम गुजर
मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री संदीप महादेव आंबोकर
उपकार्याध्यक्ष

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK SEAL